धक्का!!
सुराज्य सोलापूर
सोमवार, दि. ६ मे २०२४ । पान १२



# लग्नात भाच्याच्या मागे मामा, आबांना सांगोल्याची ऑफर

**श्री** विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांना सांगोल्यातून आमदारकीची ऑफर देऊन लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या रणधूमाळीत आमदार शहाजी पाटील यांनी चर्चेचा भूकंप घडविला. अभिजित पाटील यांना आमदारकीची ऑफर देताना आमदार शहाजी पाटील म्हणाले, आमच्या खुर्च्या पुढं तुमच्या (अभिजित पाटील) ताब्यात यायच्या आहेत. नाही पंढरपुरातून कोणी तिकीट दिलं, तर सांगोल्याला चला. माझे गुडघे काम करत नाहीत. लग्नात भाच्याच्या मागे मामा उभे राहतो... तसाच मी अभिजित पाटील यांच्या पाठीमागे उभा आहे. कुणी सांगोल्यातून निवडून आणलं नाही, तर वडिलांचं नाव लावणार नाही. तुमच्या सगळ्या इच्छा आकांशा देवेंद्र फडणवीस पूर्ण करतील, असं म्हणत शहाजी पाटील यांनी अभिजित पाटील यांना सांगोल्यातून निवडणूक लढण्याची ऑफर दिली.





अभिजित पाटील यांनी 'सीर्फ हंगाम खडा करना मक्सद नही मेरा कोशिश ये है की ये सूरत बदलनी चाहिए ! 'हा शेर फडणवीस यांच्यापुढे सादर करत त्यांच्याकडे मदतीची साद घातली. त्याला फडणवीसांनीदेखील शेर सादर करुन उत्तर दिले. या सभेत पाटील आणि फडणवीसांमध्ये शेरो-शायरी चांगलीच रंगली.

दरम्यान, पाटील म्हणाले, आम्ही त्या बाजूला (शरद पवार गट) होतो, तेव्हाही प्रामाणिक होतो, त्या काळात आम्ही तुम्हाला (देवेंद्र फडणवीस) कधीही भेटलो नाही. आता तुमच्यासोबत आलो आहोत. या बाजूलाही प्रमााणिक राहू. 'आत एक आणि बाहेर एक असे आम्ही करणार नाही' आमच्या भागातून जास्तीत जास्त मतदान करून आपण जो आमच्यावर विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासाला आम्ही पात्र ठरु, असा शब्द विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना जाहीर सभेत दिला. विठ्ठल साखर कारखान्यासाठी आपण सढळ हाताने मदत करावी, कारखान्याला जीवदान द्यावं. सभासद आणि कर्मचाऱ्यांच्या पाठीशी उभे राहावं ही विनंती करतो, असेही पाटील म्हणाले.

राज्य सहकारी बँकेच्या कारवाईनंतर आम्ही मदत मागण्यासाठी तुमच्याकडे आलो होतो. त्या वेळी आम्ही लोकसभेला तुम्हाला मदत करण्याचा शब्द दिला होता. त्यावेळी आम्हाला मदत करणार असाल, तर पुढच्या हंगामापर्यंत कारखान्याचे सर्व विषय जसे की व्याजाची सवलत, एनसीडीसीच्या माध्यमातून मदत करू, असा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला दिला आहे. त्यामुळे काखान्याबाबत आता आम्हाला निश्चिंत वाटायला लागलं, असेही पाटील यांनी नमूद केले.

### शहाजीबापूंचा गौप्यस्फोट चर्चेला उधाणच उधाण

गुरसाळेच्या सभेत सांगोल्याचे आमदार शहाजी पाटील यांनी मोठा गौप्यस्फोट केला. देवेंद्र फडणवीस यांनीच मला शिवसेनेत जाण्यास सांगितलं. त्यामुळे शिवसेनेत प्रवेश केला. पण, हा प्रवेश कुणालाच आवडला नाही, हा तो त्यांनी केलेला गौप्यस्फोट! आमदार पाटील म्हणाले, सांगोल्यात शिवसेनेच्या उमेदवाराला २००४ मध्ये १३०० मते, २००९ मध्ये ११०० मते पडली होती. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला राजमार्ग दाखवला. फडणवीसांनी सांगितलं, 'भाजपकडून तिकीट जुळत नाही, शिवसेनेत जावा.' मग मी शिवसेनेत प्रवेश केला. मात्र, हा प्रवेश कुणालाच आवडला नाही. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत धनुष्यबाणाला ७६ हजार मते पडली. आमच्याकडं पैसा, कारखाना काय, साधी पिठाची गिरणी नाही!

### आमदारकी डावावर लागली तर चालेल।

राष्ट्रवादी काँग्रेसकडून मला विधानसभेचे तिकिटही जाहीर झालं होतं. त्यामुळे मला आमदार झाल्यारखं वाटातंय, असे मी भाषणातही म्हटलं होतं. पण, आमदारकी डावावर लागली तर चालेल; पण कारखाना वाचाला पाहिजे, अशी भूमिका मी घेतली. सभासदांच्या विश्वासाशी प्रामाणिक राहण्याचा शब्द पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करेन, असेही पाटील यांनी स्पष्ट केले.

## तौल-मौल के बौल...



लोकांना नेहमी वेगवेगळ्या गोष्टी सांगून फसवणारे शरद पवार माढ्याचे खासदार असताना त्यांनी मतदारसंघाचा एकही प्रश्न सोडवला नाही. मतदार संघात पाण्याचा एकही थेंब आणला नाही. विकास करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्या उमेदवाराच्या तुतारीची पिपाणी रणजीतसिंह नाईक निंबाळकर केल्याशिवाय राहणार नाहीत. मोदी हे एकमेव नेते आहे की ते सर्वांचं भलं करू शकतात ज्या देशाचा नेता सक्षम, कणखर असतो तो देशच प्रगतीपथावर राहतो. ही लढाई रणजितसिंह नाईक निंबाळकर व धैर्यशील मोहिते पाटील अशी नाही तर या पाठीमागचे मोठे गणित माढा मतदारसंघात दडलेले आहे. या मतदारसंघात पूर्वी खासदार राहिलेले शरद पवार यांनी सांगितले होते की माढा मतदारसंघातील सर्व प्रश्न सोडवितो. त्यावेळी ते देशाचे नेते होते, केंद्रात मंत्री होते. पण त्यांच्या काळात या भागात पाण्याचा एकही थेंब आला नाही. कोणताही विकास झाला नाही. ते करू शकले नाहीत. या भागात येणारे पाणी तुमच्याकडे पोहोचल्यास ते कुठे गेले होते हे तुम्हाला कळले असते म्हणून त्यांनी याकडे बघितले नाही. तुम्ही रणजीतला निवडून दिल्यानंतर तुमचे चोरीला गेलेले पाणी परत आणले आहे. त्याचे काम सुरू झाले आहे.



– देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

# एकीकडे तयारी तीन पराभवांच्या बदल्यांची तर दुसरीकडे दहा वर्षांच्या कलंक पुसण्याची

**बहुचर्चित सोलापूर मतदार संघात 'न भूतो न भविष्यती' असा लोकसभा निवडणुकीचा कडवा संघर्ष शिगेला पोचला.आमदार प्रणिती शिंदे अन् आमदार राम सातपुते या दोघा युवा, तडफदार संघर्षयोद्धांनी एकमेकांसमोर तगडं आव्हान उभं केलं आहे. गावभेटी, वैयक्तीक गाठीभेटी, कॉर्नर बैठका अन् प्रचार सभांनी मतदार संघात अक्षरश: वातावरण ढवळून निघालंय. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, दोघांही उमेदवारांनी आपली भूमिका मतदारांसमोर मांडली आहे. मतदारांमध्येही या खेपेस निवडणुकीसंदर्भात अत्यंत उत्साहाचं वातावरण आहे. 'जितना बडा संघर्ष जित उतनी शानदार' याचा मतदार या मतदार संघात येतोय. काँग्रेस अन् भाजप उमेदवारांमध्ये अत्यंत टसल असून मोठी 'बिग फाईट' होतेय. इथल्या आरपारच्या लढाईत कोण लावणार विजयाचा अटकेपार झेंडा? कोण उधळणार गुलाल हे सांगणं भल्याभल्या ज्योतिषांना अवघड झालंय!**

**सो**लापूर लोकसभेच्या मतदार संघात २३ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात असले तरी खरी हायव्होल्टेज लढत प्रणिती शिंदे अन् राम सातपुते यांच्यात होत आहे. अपक्ष उमेदवार आतिश बनसोडे यांना वंचितनं ऐनवेळी पाठिंबा दिला आहे. तथापि 'फाईट टू फाईट' लढत शिंदे आणि सातपुते यांच्यातच होतेय. निवडणुकीमधील संघर्ष कधी नव्हे तो वेगळ्या वळणावर गेलाय. हिंदू अन् मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाचा मुद्दा प्रकर्षानं निवडणुकीत आलाय. प्रचारासाठीचे सगळे फंडे भाजप आणि काँग्रेस यांच्याकडून



वापरण्यात आलेत. निवडणुकीचा माहोल उठलाय.

माता-पित्याच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी प्रणिती शिंदे यांनी या निवडणुकीत जीवाचं अक्षरश: रान केलं. राम सातपुते यांच्यासारख्या अत्यंत



आक्रमक, तडफदार, अभ्यासू प्रतिस्पर्धी उमेदवारासोबत प्रणिती यांनी तगडी फाईट दिली आहे. तर दुसरीकडं राजकारण कोळून प्यालेल्या, दिग्गज, प्रस्थापित इतकंच काय तर गेली ५० वर्षे राजकारण हा श्वास आणि ध्यास असलेल्या पिता सुशीलकुमार शिंदे यांच्या मुशीत तयार झालेल्या तब्बल तीन टर्मचा आमदारकीचा तगडा अनुभव पाठिशी असलेल्या अत्यंत सक्षम अशा प्रणिती शिंदे यांच्याशी राम सातपुतेंनी जोरसे टक्कर दिली आहे.

दरम्यान, सोलापूर लोकसभेतील मतदारांनी आपला लोकप्रतिनिधी म्हणून दिल्लीला कोणाला पाठवायचं ठरवलंय याचा फैसला मंगळवारी (ता. ७ ) होतोय. प्रणिती शिंदे आणि राम सातपुते यांच्या राजकीय भवितव्याचा फैसला साधारण २२ लाख मतदारांकडून होतोय. त्यांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद होणार आहे.


### प्रचारात गाजलेले 'हे' मुद्दे

- सोलापूरचा विस्कळीत पाणीपुरवठा
- सोलापुरात आयटी पार्कची उभारणी
- सोलापूर शहरासह जिल्ह्यात नव्याने उद्योग आणणं
- सोलापुरात टेक्सस्टाइल हब निर्माण करणं
- सोलापूरच्या होटगी विमानतळावरुन विमान सेवा चालू करणं
- बोरामणी विमानतळ उभारणीचा प्रकल्प मार्गी लावणं
- बेरोजगारीच्या प्रश्नांवर ठोस उपाय योजना करणं
- उत्पादीत शेतमालास खर्चावर आधारित भाव मिळणं
- कांदा निर्यात बंदी, दूध दरवाढ, खतावरील १८ टक्के जीएसटी
- मराठा आरक्षणात सरकारनं घेतली भूमिका
- संविधान वाचविण्यासाठीची लढाई

### भाजपनं प्रतिष्ठा पणाला लावली

गेली दोन टर्म सोलापूर लोकसभेच्या जागेवर भाजपचं निर्विवाद वर्चस्व राहिलं. तिसऱ्या टर्मलादेखील इथं भाजपचं वर्चस्व कायम ठेऊन या पक्षाला इथं लोकसभा निवडणुकीची हॅट्ट्रिक साधायची आहे. शिवाय मागील दोन टर्ममध्ये न झालेला विकास आणि भाजपाचे निष्क्रीय खासदार हा लागलेला कलंक पुसून काढायचा आहे. शिवाय या मतदार संघातील काँग्रेस नेस्तनाबूत करायची आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार राम सातपुते यांच्या रुपानं इथली जागा निवडून आणण्यासाठी भाजपनं आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे.

### लेकीच्या विजयी गुलालासाठी पित्याकडून कायपण




सोलापूर लोकसभेच्या महासंग्रामात वेगवेगळ्या कारणांमुळं दोन वेळा पराभवाची धूळ चाखावी लागलेल्या या मतदार संघात कन्या प्रणिती शिंदे यांच्यासाठी पिता सुशीलकुमारांनी अक्षरश: जंग जंग पछाडलं. निवडणुकीची सगळी यंत्रणा आपल्या हाती ठेऊन कन्येच्या पाठिशी मताधिक्य लावण्यासाठी रात्रीचा दिवस करुन प्रयत्न चालू ठेवले. देश पातळीवर प्रणितींचं राजकीय फ्युचर ब्राईट व्हावं यासाठी सुशीलकुमारांनी सर्व तऱ्हेचे फंडे वापरलेत.

**दे**शभरात चर्चेत आलेल्या माढा लोकसभेच्या युद्धभूमीवर प्रस्थापित अन् दिग्गज फलटणकर नाईक-निंबाळकर अन् अकलूजकर मोहिते-पाटील घराण्यांमध्ये संघर्षाची घनघोर लढाई लागली आहे. विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि धैर्यशील मोहिते-पाटील या दोघा युवा तसंच तडफदार संघर्षयोध्यांमध्ये अत्यंत अटीतटीचा दुरंगी सामनाच नव्हे, तर आरपारची लढाई होतेय. या मतदार संघात निवडणुकीचं रण यापूर्वी कधी नव्हे एवढं तापलंय. नाईक-निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांनी एकमेकांपासून कडवं आव्हान उभं केलंय. शरद पवार व देवेंद्र फडणवीस या राज्याच्या राजकारणामधील दोघा दिग्गजांनी इथली निवडणूक आपल्या हाती घेतली आहे. अत्यंत चुरशीच्या होत असलेल्या इथल्या निवडणुकीत विजयाचा गुलाल कोण उधळणार? हे सांगणं तर दुरच पण नाईक-निंबाळकर अन् मोहिते-पाटील या दोघांमध्ये कोणाचं पारडं जड हे सांगणं राजकीय जाणकारांना अवघड झालंय.

माढा लोकसभेच्या मतदार संघात प्रत्यक्ष ३२ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात उतरले असले तरी खरी लढत ही खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि धैर्यशील मोहिते-पाटील या दोघांमध्ये आहे. भाजप आणि राष्ट्रवादी शरचंद्र पवार गट या दोन्ही पक्षांनी आपल्या उमेदवारांसाठी मोठी ताकद या मतदार संघात लावली आहे. नाईक-निंबाळकर अन् मोहिते-पाटील यांनी दोघांनी मतदार संघात हायटेक प्रचार यंत्रणेच्या माध्यमातून निवडणुकीची राळ उडवली आहे. प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या तुलनेत आपण कसे उजवे उमेदवार आहोत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न नाईक-निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांनी केला आहे. संपूर्ण मतदार संघात प्रचार टिपेला पोचला आहे. निवडणुकीच्या तापलेल्या हवेनं मतदारांमध्ये निवडणुकीच्या संदर्भात उत्साह चांगलाच संचारलेला दिसतोय. कधी नव्हे ते लोकसभेच्या निवडणुकीला एवढं महत्त्व प्राप्त झालं आहे.

विद्यमान खाासदार नाईक-निंबाळकर यांनी साडेचार वर्षात केलेल्या विकास कामांचा अजेंडा मतदारांसमोर ठेऊन मार्गी लावलेली विकास कामे पूर्णत्वास नेण्यासाठी आणि नव्या प्रकल्पांसाठी मतदारांना आशीर्वाद मागितले आहेत. तर धैर्यशील मोहिते-पाटील यांनी या टर्ममध्ये विकास कामांवर आलेल्या मर्यादेच्या पार्श्वभूमीवर, पुढील पाच वर्षात विकासाचं आपलं काय व्हिजन आहे, ते मतदारांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला आहे.



# माढ्यात पवार आणि फडणवीसांची खरी परीक्षा!



### शरद पवारांच्या नेतृत्वाची शक्ती परीक्षा

राष्ट्रवादीसोबत काडीमोड करुन भाजपमध्ये गेलेल्या मोहिते–पाटील यांच्याशी अपरिहार्यता म्हणून शरद पवारांनी जूळवून घेतलं. मोहिते–पाटलांनी ज्या चुका केल्या त्या पोटात घेऊन मोठ्या मनानं त्यांना माफ करुन आपल्या पक्षात घेऊन पवार यांनी धैर्यशील मोहिते–पाटील यांना उमेदवारी दिली. शिवाय त्यांच्या पाठिशी मोठी ताकद या निवडणुकीसाठी उभी केली. आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या विजयासाठी त्यांनी अनेक डाव–प्रतिडाव इथं टाकले आहेत. मात्र, इथला निवडणुकीचा अत्यंत निर्णायक सामना पाहता शरद पवारांच्या नेतृत्वाची जणू शक्ती परीक्षा या मतदार संघात होत आहे.





### 'या' मुद्यांवर रंगला प्रचार

- निरा देवघर प्रकल्पात माळशिरस तालुक्यातील गावांचा समावेश
- टेंभू योजनेचं सांगोल्याच्या माणनदीत ऐन उन्हाळ्यात आलेलं पाणी
- विद्यमान खासदार म्हणून नाईक-निंबाळकरांनी केलेली विकास कामे
- करमाळ्यातील रिटेवाडी सिंचन प्रकल्पाची मंजूर
- नाईक-निंबाळकरांकडून काही विकास कामे करताना आलेल्या मर्यादा
- विद्यमान सरकारने घेतलेल्या काही निर्णयाचे नकारात्मक परिणाम
- प्रस्थापित मोहिते-पाटील यांची माळशिरस तालुक्यातील दहशत
- मोहिते-पाटील यांनी मोडित काढलेल्या अनेक संस्था आणि सभासद, शेतकरी यांचं केलेलं नुकसान
- दुष्काळी परिस्थिती, पिण्याच्या अन् सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न
- मोहिते-पाटील समर्थकांकडून झालेल्या हाणामाऱ्या, दाखल गुन्हे, पोलीस स्टेशन अन् कोर्टाच्या पायऱ्या
- मराठा आरक्षणाला आडवं गेलेलं सरकार
- महागाई, दुष्काळी परिस्थिती, पाणी टंचाई, शेतमाल दर, दूध दरवाढ



### देवेंद्र फडणवीसांचं अस्तित्व पणाला

माढा मतदार संघाची जागा नाईक–निंबाळकरांच्या रुपानं जिंकून आपलं वर्चस्व सिद्ध करण्यासाठी या मतदार संघावर अधिक लक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं अस्तित्वच जणू इथं पणाला लागलं आहे. 'आम्हीच जिंकू' असं अत्यंत आत्मविश्वासानं या मतदार संघाबद्दल सांगणाऱ्या फडणवीसांनी अनेक डाव इथं टाकलेत. अनेक रणनिती प्रत्यक्षात अंमलात आणल्या आहेत. नाईक–निंबाळकरांना निवडून आणण्यासाठी पीचच्या पुढे जाऊन फडणवीसांनी इथं बॅटिंग केली आहे. मोहिते–पाटलांना त्यांची जागा दाखवून देण्यासाठी अत्यंत इर्षेला पेटलेल्या फडणवीसांनी टाकलेले डाव–प्रतिडाव यामध्ये ही निवडणूक अटीतटीची झाली आहे.